# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

ग्राहक तक्रार क्र. २०–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. रावसो आप्पासो जानकर,<br>रा. कोकळे, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. रावसो आप्पासो जानकर, रा. कोकळे, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली यांनी मंचासमोर दिनांक ११.२.२०१० रोजी तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार यांनी वितरण कंपनीकडे शेतीपंपासाठी विद्युत पुरवठा मिळणेसाठी वि.प.कडे दि. ३०.१२.२००९ ला अर्ज दिला व त्यासाठी भरावी लागणारी फी रु. ५०/– पोष्टाचा मनीऑर्डरने पाठविली वि.प.ने त्यांना कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे ३० दिवसांचे आंत म्हणजे दि. २९.१.२०१० पर्यंत चलन देणे आवश्यक होते, ते दिले नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे क्ष फॉर्ममध्ये रितसर तक्रार दाखल केली अंतर्गत कक्षाने आदेश क्र. १२३ दि. ४.१.२०१० नुसार कृती मानके विनियमातील तरतुदींचे पालन करण्यात वि.प.ला अपयश आल्यास ग्राहकास भरपाई द्यावी असे निर्देश करण्यात आले आहेत.

तक्रारदाराने मंचाकडे दि. ११.२.२०१० ला तक्रार दाखल केली व विलंबाच्या कालावधीसाठी भरपाई मिळावी अशी विनंती केली. वितरण कंपनीने नोटीस देवूनही ३ मार्च २०१० पर्यंत आपला लेखी अहवाल दिला नाही.

सदरच्या तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. २२.३.२०१० ला घेण्यात आली. परंतु वि.प.च्या मार्च वर्षाखेरच्या वसुली मोहिमेमुळे त्यांचे विनंतीवरुन सुनावणी दि. ५.४.२०१० रोजी घेण्यात आली. वि.प.तर्फे श्री. अे.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग व श्री. राखे, सहाय्यक अभियंता, कवठे महांकाळ उप विभाग उपस्थित. त्यांनी तक्रारदार यांस दि. १६.२.२०१० रोजी चलन दिल्याचे सांगितले. तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित त्यांनी या बाबत आक्षेप घेतला नाही.

उभयबाजूंच्या लेखी/ तोंडी कथनानुसार तक्रारदार यांनी दि. ३०.१२.२००९ रोजी अर्ज दिला आहे हे स्पष्ट होते व त्यासोबत आवश्यक ती फी भरली आहे. १ महिन्याच्या आंत म्हणजे दि. २९.१.२०१० पर्यंत चलन देणे आवश्यक होते ते दिले नाही. अंतर्गत कक्षाने दि. ४.१.२०१० च्या आदेशात वि.प.ने भरपाई द्यावी असे आदेश दिले आहेत. यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, अंतर्गत कक्षाने दि. ४.१.२०१० ला आदेश देवूनही जवळजवळ ४२ दिवसांनी म्हणजे दि. १६.२.२०१० ला चलन दिले. त्यामुळे दि. २९.१.२०१० ते १६.२.२०१० या कालावधीच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे ३ आठवड्यांच्या विलंबासाठी रु. ३००/- भरपाई देणेस वि.प. जबाबदार आहे.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.ने तक्रारदार यांस दि. २९.१.२०१० ते १६.२.२०१० या ३ आठवडे विलंबाच्या कालावधीसाठी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे रु. ३००/- भरपाई द्यावी. सदर रकमेचे बिलात समायोजन करण्यात यावे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांजकडे करता येईल.

५)

दिनांक : ६.४.२०१० ( बी. जी. पवार )

अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :